सत्यमेव जयते

**जी. श्रीकांत** भा.प्र.से.
आयुक्त

**महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर**
दूरध्वनी : (०२४०)२३३११९४
ईपीबीएक्स : (२०४०) २३३३५३६-४०
Website: www.chhsambhajinagarmc.org
Email : commissioner@chhsambhajinagarmc.org

जा.क्र.मनपा/शिक्षण/आनापान/कावि/२०२३/ 407 दिनांक : १३/०६/२०२३

विषय :- औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आनापान विद्येचा लाभ मिळणे बाबत.

आदरणीय महोदय, श्री आचार्य चंपालाल जी,

प्रस्तुत महानगरपालिकेने आनापान साधना पध्दती विपश्यना शिकण्याची पहिली पायरी महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठीचा निर्णय घेतलेला आहे. बालपणी व पौगंडावस्थेत वाटणारी परीक्षेची चिंता,काळजी व ताणतणाव विद्यार्थी आनापान साधनेद्वारे अत्यंत आत्मविश्वासाने हाताळू शकतात. याद्वारे स्वतःच्या अंतर्मनामध्ये डोकावून मनाची पूर्ण एकाग्रता अनुभवतात.आनापान साधनेच्या दैनंदिन सरावामुळे मुलांमध्ये एकाग्रता वाढते, मनाची जागरुकता व सतर्कता वाढते. स्वयंशासन वृध्दिंगत होते. स्मरण शक्ती वाढते,निर्णय क्षमता वाढते, आत्मविश्वास वृध्दिंगत होतो. भीती,राग,चीड,उदासिनता कमी होते, कार्यक्षमता वाढते.स्वयंशिस्त,अभ्यास,खेळ व अन्य क्रियाशीलतेमध्ये सहभाग वाढतो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ होत असल्यामुळे महानगरपालिकेच्या खालील शाळांमध्ये विद्यार्थी संख्येनुसार आनापान शिबिराचे आयोजन करण्यासाठी आपणास विनंती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचा तपशिल | शाळा संख्या | १ ते ५ वी पर्यंत | | ६ वी ते ८ वी पर्यंत | | ९ वी ते १० वी पर्यंत | | एकूण | | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| ०१ | मराठी माध्यम | ४९ | ३१६३ | २५६२ | १४९८ | ११९१ | ६९३ | ५५३ | ५३५४ | ४३०६ | ९६६० |
| ०२ | उर्दु माध्यम | २१ | ११४६ | १४७२ | ५६६ | ७८२ | ३१० | २९६ | २०२२ | २५५० | ४५७२ |
| ०३ | सीबीएससी | ०५ | ५५ | ६४ | -- | -- | -- | -- | ५५ | ६४ | ११९ |
| ०४ | बालवाडी शाळा | १३६ | -- | -- | -- | -- | -- | -- | १८५७ | १८८७ | ३७४४ |

वरील प्रमाणे विद्यार्थी संख्या असून शाळेची यादी स्वतंत्रपणे यासोबत जोडलेली आहे. महानगरपालिकेच्या सर्व शाळा दिनांक १५ जून २०२३ पासून सुरु होत आहे.

शाळेच्या पहिल्या सप्ताहापासून आनापान शिबिराचे आयोजन करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आनापान विद्येचा लाभ मिळण्यासाठी नियोजन होईल असे पहावे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके अंतर्गत आनापान साधनेचा उपक्रम एक प्रकल्प म्हणून हाती घेण्यात येत आहे .त्यामुळे विद्यार्थ्यांची आनापान शिबिर सुरु करण्यापूर्वीची स्थिती व आनापान कार्यक्रम निरंतर सुरु झाल्यानंतरची स्थिती ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध अवस्थेमध्ये होणारे बदल यानुषंगाने कृती कार्यक्रम तयार करणेसाठी आपणास विनंती करण्यात येत आहे.

या अनुषंगाने प्रशासन आपणास व आपल्या अधिनस्त असणारे बालशिबिर शिक्षक यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठीच्या सूचना शाळास्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

कृपया सदरचा प्रकल्प यशस्वी होणे व सर्व मुलांना लाभ मिळणेच्या अनुषंगान आपल्या सहकार्याची अपेक्षा करतो.

आपला स्नेहांकीत,

जी.श्रीकांत ( भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

प्रति,
मा.चंपालालजी खिंवसरा
क्षेत्रिय आचार्य (विपश्यना)
मराठवाडा विभाग,औरंगाबाद.

<u>प्रत :</u>

मुख्याध्यापक, कें.प्रा.शा/प्रा.शा.............................. महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना देवून सूचित करण्यात येते की, वरीलप्रमाणे आनापान शिबिराचे आयोजन आपल्या शाळेमध्ये यशस्वीरित्या होणेसाठी बालशिबिर शिक्षकास आवश्यक ते सहकार्य करणेसाठी निर्देश देण्यात येत आहे.

स्वाक्षरित
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर